# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:- कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२०                    दि. २ डिसेंबर,२०२०

जळगाव दि.२ (            ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभागाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ करिता ऑनलाईन प्रवेशासाठी अर्ज सादर करण्याची मुदत दि.३० नोव्हेंबर पर्यंत होती. आता दि.१५ डिसेंबर, २०२० पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभागाच्या एम.ए. मराठी, हिंदी, इंग्लिश, समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, सरंक्षण व सामरिकशास्त्र, एम.ए. शिक्षणशास्त्र, एम.कॉम. व एल.एल.एम अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करण्याची मुदत दि.१५ डिसेंबर पर्यंत वाढविण्यात आली आहे. बऱ्याच विद्यापीठांचे विविध अभ्याक्रमांचे निकाल कोविड-१९ च्या महामारी मुळे जाहीर न झाल्यामुळे विद्यार्थ्यांना विभागात प्रवेश घेण्यास अडचणी येत आहेत. विद्यार्थी प्रवेशा पासून वंचित राहू नये म्हणून सदरची मुदत वाढविण्यात आली असल्याचे बहि:स्थ शिक्षण अध्ययन विभागाचे संचालक प्रा.ए.बी.चौधरी यांनी कळविले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(प्रमोद आ.चव्हाण)

जनसंपर्क अधिकारयांच्या करिता